ePaper

डोनाल्ड ट्रम्प पुन्हा ठरले व्हिलन, भारताला सर्वात मोठा झटका!

वर्ष - 9 । अंक -102 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- जो रूटचा ब्रिस्बेन कसोटीत तडाखा!
- विशाखापट्टणममध्ये भारताची पाटी कोरी!
- मोदी-पुतिन उद्या द्विपक्षीय चर्चा करणार
- दंतेवाडा: आतापर्यंत 16 नक्षलवादी ठार


www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 5 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**कमी पटाच्या शाळा बंदचा फटका** शाळाबाह्य मुलींची संख्या पुन्हा वाढली


# राज्यात 15 हजार मुली शाळाबाह्य!

## प्रवास, असुरक्षितता, बालविवाह... शिक्षणापासून दूर होणाऱ्या मुलींची संख्या पुन्हा वाढली

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यातील शिक्षण व्यवस्था आधुनिक तंत्रज्ञान, नवीन अभ्यासक्रम आणि मोठ्या सुधारणा यांची चर्चा झपाट्याने होत असताना एक भयावह वास्तव पुढे आले आहे. केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात १५ हजार ३५७ किशोरवयीन मुली अजूनही शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर आहेत. राज्यात अनेक योजना असूनही — मोफत शिक्षण, प्रवास भत्ता, पोषण आहार — मुलींच्या शिक्षणात अडथळे वाढतानाच दिसत आहेत.**

गेल्या काही वर्षांत शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याचा दावा केला गेला, मात्र ताज्या आकडेवारीने प्रशासनाचे दावे खोडले आहेत. शिक्षण क्षेत्रातील तज्ञ आणि शिक्षक यांच्या मते याचा सर्वात मोठा परिणाम मुलींवर होत असून, "शाळा जवळ असणे" हा मुद्दा आजही अत्यंत निर्णायक आहे.



**मुली शिक्षणापासून दूर — कारणांची मोठी यादी!**

कमी पटाच्या शाळा बंद — सर्वात मोठे धक्कादायक चित्र आहे. राज्यातील अनेक छोट्या गावे आणि वाड्यांमध्ये कमी पटामुळे शाळा बंद केल्या जात आहेत. परिणामी मुलांच्या घरापासून शाळेचे अंतर वाढले, प्रवास अनिवार्य झाला.

**पालकांच्या सुरक्षिततेच्या चिंतेमुळे मुलींना शाळेत पाठवणे बंद.**

शिक्षकांचे म्हणणे स्पष्ट — "एकदा शाळा गावात बंद झाली की मुलींची उपस्थिती सर्वात आधी घटते." सुरक्षेचा प्रश्न — पालक भयभीत अनेक जिल्ह्यांत मुलींच्या छेडछाडीच्या घटना, प्रवासात धोका, सावज बनण्याची भीती...या कारणांनी पालक शाळेत पाठवण्याऐवजी घरी ठेवणे निवडतात.

मुलांना ये-जा सोपी, पण मुलींबाबत सामाजिक भीती जास्त

अगदी लहान घटना घडली तरी शाळेपासून कायमचं दूर करणं पालकांचे पहिले पाऊल!

जिल्हा परिषद शाळेतील एका शिक्षकाचे निरीक्षण: "घटनेनंतर आई-वडील मुलींना शाळेकडे पाठवायला तयार होत नाहीत, त्यातून मुली कायमच शिक्षणापासून दूर जातात."

**बालविवाह — मुलींच्या भविष्याला गंड**

- ग्रामीण समाजात अजूनही ही विडंबनात्मक प्रथा

बालविवाह = शिक्षणाचा शेवट!

- १४-१६ वयात लग्न लावण्याची अनेक उदाहरणे

शिक्षणाची ओढ असूनही सामाजिक अडथळे

- " लग्न झालं की शाळा संपली " — अशी मानसिकता कायम

हे चित्र मुलींच्या स्वप्नांवर मोठा गदा आणणारे!

**माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था अपुरी**

काही गावांमध्ये प्राथमिक शाळा असते, पण ८वी-१०वी वर्ग नसतात म्हणून लहान वयातील मुलींना दूरच्या शाळेत पाठवणे अनिवार्य. सुरक्षिततेच्या कारणाने पालक नकार देतात. शिक्षणाचे पल्ले न वाढवता थांबवले जाते,

यामुळे अनेक मुली चौथीनंतर किंवा सातवीनंतर शिकणे थांबवतात.. देशातील स्थिती: भारताची गंभीर चिंता!

**भारतभरात:**

**८ लाख ४९ हजार ९९१ विद्यार्थी शाळाबाह्य**

**त्यापैकी ३ लाख ७८ हजार ८७७ मुली**

**मुलींचे शिक्षण थांबण्याची कारणे**

भारतभर सारखीच — सुरक्षा, दारिद्र्य, अंतर, कुटुंबाची मानसिकता, आणि बालविवाह

**शिक्षक आणि तज्ञांचे मत** — "शाळा गावात असलीच पाहिजे!"शाळा बंद करणे = विकासाला विरोधी पाऊल, लहान मुलींच्या शिक्षणाचा पाया गावातच मजबूत होतो, शाळा बंद केल्यास मुली आयुष्यभरासाठी शिक्षणप्रवाहाबाहेर जातात.

"एक शाळा बंद केली म्हणून शासनाला खर्च कमी होतो, पण मुलींचं संपूर्ण भविष्य गडगडतं."

शासनाच्या योजना — कागदावर चांगल्या, अंमलबजावणीत मात्र कमतरता पहायला मिळते.

शुल्कमाफी दुर्बल घटक माहितीचा अभाव, लाभ घ्यायला अडथळे, योजना आहेत, पण पालकांपर्यंत विश्वास आणि माहिती पोहोचत नाही.

**समाधानाचे मार्ग — तज्ज्ञांची मांडणी**

- प्रत्येक वाड्यावर लहान शाळा, कमी पट असला तरी चालेल
- सुरक्षित शालेय वाहतूक व्यवस्था — विशेषतः मुलींसाठी
- गावपातळीवर जागृती — बालविवाह रोखा
- शाळेकडे विश्वासपूर्वक वातावरण निर्मिती
- शिक्षक-पालक संवाद वाढवणे
- शाळाबाह्य विद्यार्थ्यांची तपासणी व तत्काळ पुनर्दाखल

**मुलींचे शिक्षण थांबले तर काय?**

- आयुष्यभर मागे पडणे
- रोजगाराच्या संधी मर्यादित
- छोट्या हातात मोठ्या जबाबदाऱ्या
- अत्याचार आणि दडपशाहीची बळी

एक मुलगी शिकली, तर संपूर्ण परिवाराची प्रगती होते — हे विधान केवळ घोषणा नसून वास्तवही आहे.

निष्कर्ष: बदलाची गरज — आत्ताच्या आत्ता!

राज्यातील १५ हजार मुली शाळेबाहेर असण्यामागे व्यवस्थेतल्या त्रुटी आणि समाजातील पूर्वग्रह दोन्ही समान जबाबदार आहेत.

**शासनाने काय केले पाहिजे?V**

- शाळा बंद करण्यापूर्वी पर्याय उपलब्ध करणे
- प्रवासाची सुरक्षितता प्राधान्याने वाढवणे


## राज्याची धक्कादायक आकडेवारी

| विभाग | संख्या |
|---|---|
| शाळाबाह्य मुली (किशोरवयीन) | १५,३५७ |
| शाळाबाह्य मुले-मुली एकूण | ३०,७१४ |

यापैकी किती विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत दाखल केले? — सरकारकडे स्पष्ट नोंद उपलब्ध नाही. हे पाहता राज्यातील प्रशासन शाळाबाह्य विद्यार्थ्यांना परत आणण्याच्या प्रयत्नात मागे पडलेलं दिसतं.

## सर्वाधिक शाळाबाह्य मुली असलेली राज्य

**आसाम — ५७,४०९**
**उत्तरप्रदेश — ५६,४६२**
**झारखंड — २६,८८२**
**आंध्रप्रदेश — १७,५८४**
**जम्मू-काश्मीर — १६,९००**
**हरियाणा — १६,२६९**
**महाराष्ट्रही वाढत्या क्रमाकडे!**



## व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल पुण्यातील महिला उमेदवारांवर गुन्हा दाखल

# EVM ची पूजा करणं पडलं महागात

## भाजपच्या उमेदवारांवर गुन्हा दाखल

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा (LOCAL BODY ELECTIONS) उत्साह आहे. पहिल्या टप्प्यामध्ये नगर पंचायत आणि नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर मतदान देखील पार पडले आहे मात्र निकाल लांबणीवर पडला. न्यायालयाच्या निकालानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा निकाल हा 21 डिसेंबर रोजी लागणार आहे. मात्र मतदान करताना देखील मतदान केंद्रावर अनेक प्रकार झाल्याचे उघडकीस आले. काही ठिकाणी घोषणा, वाद झाले तर पुण्यामध्ये (PUNE NEWS) चक्क ईव्हीएम मशीनची पूजा करण्यात आली.**

याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर संबंधित महिला उमेदवारांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. वडगाव नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि २) झालेल्या मतदान प्रक्रियेच्या सुरुवात झाली. मात्र त्यापूर्वी मतदान केंद्रामध्ये येऊन मतदान यंत्र कक्षाची महिला उमेदवारांनी पूजाअर्चा केल्याचे समोर आले. मतदान केंद्रामध्ये प्रवेश करत थेट ईव्हीएम मशीनची पूजा करून आचारसंहितेचा भंग व परमार्थिक दूषणाचा विषय निर्माण होईल असे कृत्य केल्याप्रकरणी वडगाव मावळ पोलिसांनी हे कृत्य करणाऱ्या दोघांवर कारवाई केली आहे. या प्रकरणी वडगाव मावळमधील नगराध्यक्ष पदाच्या भाजपच्या उमेदवार व राष्ट्रवादीच्या उमेदवारांसह माजी नगराध्यक्षांवर गुन्हा दाखल केला आहे.भाजपच्या उमेदवार अॅड मृणाल गुलाबराव म्हाळसकर, राष्ट्रवादीच्या उमेदवार अबोली मयुर ढोरे व माजी नगराध्यक्ष मयूर ढोरे या तीन जणांवर गुन्हा दाखल झाला असून याप्रकरणी मतदान केंद्राध्यक्ष नवनाथ दळवी व भागवत झांबरे यांनी फिर्याद दिली आहे. पोलिस निरीक्षक अभिजीत देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव नगरपंचायत निवडणुकीसाठी शहरातील २४ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडली. यापैकी रमेशकुमार साहनी इंग्लिश स्कूलमध्ये असलेल्या प्रभाग क्रमांक ६ व प्रभाग क्रमांक ८ या दोन मतदान केंद्रांमध्ये जाऊन मतदान केंद्राध्यक्ष दळवी व भागवत यांनी मज्जाव केला असताना मृणाल म्हाळसकर, अबोली ढोरे व मयुर ढोरे यांनी दोन्ही प्रभागाच्या मतदान केंद्रातील मतदान कक्षाची पूजाअर्चा केली. त्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग झाला असून परमार्थिक दूषणाचा विषय निर्माण होईल असे कृत्य करण्यात आले आहे. त्यानुसार तिघांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम-२२१, २२३, १७१ (ब) सह लोक प्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम १३०, १३१, १३२ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद देण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक कैलास कदम व पोलिस उपनिरीक्षक उमेश जाधवराव हे करत आहेत.स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा (LOCAL BODY ELECTIONS) उत्साह आहे.पहिल्या टप्प्यामध्ये नगर पंचायत आणि नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर मतदान देखील पार पडले आहे मात्र निकाल लांबणीवर पडला. न्यायालयाच्या निकालानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा निकाल हा 21 डिसेंबर रोजी लागणार आहे. मात्र मतदान करताना देखील मतदान केंद्रावर अनेक प्रकार झाल्याचे उघडकीस आले. काही ठिकाणी घोषणा, वाद झाले तर पुण्यामध्ये (PUNE NEWS) चक्क ईव्हीएम मशीनची पूजा करण्यात आली. याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर संबंधित महिला उमेदवारांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. वडगाव नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि २) झालेल्या मतदान प्रक्रियेच्या सुरुवात झाली. मात्र त्यापूर्वी मतदान केंद्रामध्ये येऊन मतदान यंत्र कक्षाची महिला उमेदवारांनी पूजाअर्चा केल्याचे समोर आले. मतदान केंद्रामध्ये प्रवेश करत थेट ईव्हीएम मशीनची पूजा करून आचारसंहितेचा भंग व परमार्थिक दूषणाचा विषय निर्माण होईल असे कृत्य केल्याप्रकरणी वडगाव मावळ पोलिसांनी हे कृत्य करणाऱ्या दोघांवर कारवाई केली आहे.




### आचारसंहितेचा भंग

या प्रकरणी वडगाव मावळमधील नगराध्यक्ष पदाच्या भाजपच्या उमेदवार व राष्ट्रवादीच्या उमेदवारांसह माजी नगराध्यक्षांवर गुन्हा दाखल केला आहे.भाजपच्या उमेदवार अॅड मृणाल गुलाबराव म्हाळसकर, राष्ट्रवादीच्या उमेदवार अबोली मयुर ढोरे व माजी नगराध्यक्ष मयूर ढोरे या तीन जणांवर गुन्हा दाखल झाला असून याप्रकरणी मतदान केंद्राध्यक्ष नवनाथ दळवी व भागवत झांबरे यांनी फिर्याद दिली आहे.

# विद्यार्थ्यांनी अनुभवली NASA ची सफर

## महाराष्ट्रातील दुसरी उपक्रमशील ठरली पुणे जिल्हा परिषद

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी १६ ते २७ नोव्हेंबर या बारा दिवसांत अमेरिकेतील नासाला भेट देत विज्ञान आणि शेतकरी कुटुंबातील २५ विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा अनोख्या अविष्कारासह विविध अभ्यास केंद्रांतील तज्ञांशी संवाद साधला. जिल्हा परिषद पुणे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबवण्यात आला असून महाराष्ट्रामध्ये विद्यार्थ्यांसाठी नासा संस्थेची भेट राबविणारी पुणे जिल्हा परिषद ही दुसरी उपक्रमशील जिल्हा परिषद ठरली आहे.**



विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांच्या पुढाकारातून हा अभ्यास दौरा घेण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पहिल्यांदाच विमानात बसण्याचा अनुभव मिळाला. अमेरिकेतील महत्त्वाची वैज्ञानिक केंद्रे व अंतराळातील महत्त्वपूर्ण घडामोडींचा अभ्यास या दौऱ्यामुळे झाला. मुंबई-अबुधाबी- व्हाया वॉशिंग्टन असा प्रवास करत विद्यार्थी अमेरिकेत दाखल झाले. यावेळी पुण्यातील आयुका संस्थेचे शास्त्रज्ञ समीर दुरडे विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते.दिनांक १६ ते २७ नोव्हेंबर या काळात विद्यार्थ्यांनी उद्वार हेझी एअर अँड स्पेस म्युझियम, इंडियन ॲम्बेसी, स्मिथ सोनियन नॅशनल एअर अँड स्पेस म्युझियम, गोल्डन गेट ब्रिज, लोम्बार्ड स्ट्रीट, कॅलिफोर्निया सायन्स सेंटर, डिझ्नीलँड, एस्ट्रोनॉट ट्रेनिंग सेंटर, कॉम्प्युटर हिस्टरी म्युझियम, टेक इटर ॲक्टिव म्युझियम, स्टॅन्ड फोर्ड युनिव्हर्सिटी या ठिकाणी भेट दिलीय तसेच २७ नोव्हेंबरला बंगलोर येथे आयुक्त व इस्रोच्या शास्त्रज्ञांची भेट घेतली.

### विद्यार्थी ठरले कौतुकास पात्र

वॉशिंग्टन डीसी येथे स्मिथ सोनियन नॅशनल एअर अँड स्पेस म्युझियमला भेटीदरम्यान भारतीय विद्यार्थ्यांनी दाखवलेली शिस्त, साधलेला संवाद पाहून स्थानिक शिक्षक व अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे कौतुक केले. भविष्यामध्ये अंतराळवीर व शास्त्रज्ञ बनण्यासाठी शुभेच्छा दिल्या.ज्या गोष्टी, ठिकाणे संगणक व मोबाईलमध्ये पाहिली ती प्रत्यक्षात अनुभवास मिळाली याचा अत्यानंद आहे. प्रवासामध्ये अमेरिकन अधिकारी व ग्रामस्थांचा सुखकारक अनुभव आला. जिल्हा परिषद पुणे यांनी आमच्यासाठी बालवयामध्ये अमेरिकेचा अभ्यास दौरा अविस्मरणीय प्रसंग आहे.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सूचना | पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांशी

# भाजपाचा प्रत्यक्ष संवाद अन जनतेचा जाहिरनामा!

## महानगरपालिका निवडणुकीसाठी पिंपळे-सौदागर येथे महत्वपूर्ण बैठक

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना अपेक्षित विकासकामांसाठी किंवा सुधारणांसाठी नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधा आणि योग्य सूचना संकलित करून लोककेंद्रीत जाहीरनामा तयार करा. भाजपा सत्ताकाळात केलेली विकासकामे आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प घराघरात पोहोचतील, असे नियोजन करा, अशा सूचना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शहरातील पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.**



> “आगामी महानगरपालिका निवडणुकीत प्रत्येक प्रभागातील नागरिकांपर्यंत भाजपच्या विकासकामांची माहिती पोहोचवणे आणि नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेणे ही आमची प्राथमिकता आहे. यासाठी अर्ज, प्रभागनिहाय बैठक आणि जनसंपर्क या सर्व गोष्टी वेळेत आणि प्रभावी पद्धतीने राबवल्या पाहिजेत, अशा सूचना पदाधिकारी, पक्षाचे लोकप्रतिनिधी यांना दिल्या आहेत.
>
> **– चंद्रकांत पाटील,** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

> “महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम्ही प्रत्येक प्रभागात बैठक घेऊन उमेदवारांची क्षमता तपासणार आहोत. यामध्ये बूथ रचना, शक्तिकेंद्र रचना आणि कार्यप्रणाली यांचा सखोल आढावा घेण्यात येईल. शहरातील ३२ प्रभागांमध्ये बैठकांचे नियोजन आहे. “अबकी बार 100 पार” असा आमचा निर्धार आहे.
>
> **– शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व लोकप्रतिनिधी, माजी खासदार, आमदार आणि प्रमुख पदाधिकारी यांची राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतपाटील यांनी आढावा बैठक घेतली.

यावेळी प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस विकास डोळस, मधुकर बच्चे, वैशाली खाडे, माजी शहराध्यक्ष सदाशिव खाडे, दक्षिण भारतीय आघाडीचे प्रदेश संयोजक राजेश पिल्ले, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी महापौर नितीन काळजे, माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव, महिला शहराध्यक्ष सुजाता पालांडे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष चेतन भुजबळ, अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष अनिल घोलप, मंडलाध्यक्ष गणेश ढोरे, शिवराज लांडगे, मंगेश धाडगे, जयदीप खापरे, धरम वाघमारे, अजित बुर्डे, रामदास कुटे, अमोल डोळस, सोमनाथ तापकीर, मोहन राऊत, हर्षद नढे, अनिता वाळुंजकर पदाधिकारी उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील यांनी बैठकी दरम्यान शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांना निवडणूक इच्छुकांसाठी अर्ज वितरणाची कार्यवाही सुरू करण्यास सांगितले. त्यांनी निर्देश दिले की, आगामी ५ दिवसांत इच्छुक उमेदवारांचे अर्ज भरुन घेणे आवश्यक आहे आणि सदरचे अर्ज पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयातून वितरीत केले जावेत. अर्जाचा स्वीकार स्वतः शहराध्यक्ष करणार आहेत. त्याचबरोबर, प्रत्येक प्रभागनिहाय किमान ५ हजार घरांमध्ये पक्षाचा जाहीरनामा पोहोचवणे आणि संपूर्ण शहरातील किमान ५० हजार नागरिकांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन भाजपच्या सत्ताकाळात झालेल्या विकासकामांची तसेच राज्य व केंद्र सरकारच्या प्रकल्पांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील ३२ प्रभागांमध्ये प्रभागनिहाय बैठका घेण्यात येणार आहेत. या बैठका उमेदवारांची क्षमता तपासण्यासाठी तसेच बूथ रचना, शक्तिकेंद्र रचना आणि कार्यप्रणाली यांचा आढावा घेण्यासाठी आयोजित केल्या जातील, अशी भूमिका शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी मांडली.

# शहरात नवीन मेट्रो मार्ग विकसित करण्याकडे दुर्लक्ष

## पुणे शहरात 100 किलो मीटरपेक्षा अधिक मार्गावर मेट्रोचे जाळे

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : पुणे शहरात १०० किलो मीटरपेक्षा अधिक मार्गावर मेट्रोचे जाळे निर्माण होत असताना, पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रो विस्तारीकरणाकडे केंद्र आणि राज्य सरकारचा काणाडोळा होत आहे. पुण्यातील मेट्रोच्या दोन नवीन मार्गांना केंद्र सरकारने हिरवा कंदील दिला असताना, पिंपरी-चिंचवड शहरात नवीन मार्ग विकसित करण्याकडे दुर्लक्ष झाले आहे.**




### मेट्रोचे संचालकच प्रभारी पालिका आयुक्त

सध्या महामेट्रोचे स्टेअरिंग हातात असलेले श्रावण हर्डीकर यांच्या आयुक्तपदाच्या कालावधीत पिंपरी ते दापोडी मेट्रोला मान्यता मिळाली. आता निगडी ते चाकण पट्ट्याला जोडणाऱ्या मार्गाचा आराखडा तयार होत आहे. महापालिकेच्या आयुक्त पदाचाही प्रभारी पदभार त्यांच्याकडे आहे. त्यामुळे हर्डीकर यांनी निगडी ते चाकण या मार्गाचा लवकरातलवकर आराखडा तयार करून राज्य, केंद्र सरकारकडे पाठवावा. तो मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा शहरवासीयांकडून व्यक्त केली जात आहे.

> “पुणे शहरात १०० किलोमीटर अंतरावर मेट्रोचे जाळे होत असताना राज्यकर्त्यांचे औद्योगिकनगरीत मेट्रो विस्तारीकरणाकडे दुर्लक्ष होत आहे. मेट्रो मार्ग वाढविण्यासाठी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री, महायुतीचे खासदार, पाच आमदार कमी पडत आहेत.
>
> **–रमेश वाघेरे,** सामाजिक कार्यकर्ते.

औद्योगिक, कामगारनगरी म्हणून जगाच्या नकाशावर ओळख निर्माण केलेल्या शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात गेली आहे. सध्या पिंपरी ते दापोडी या साडेसात किलोमीटर मार्गावर मेट्रो धावत आहे. निगडी येथील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापर्यंत साडेचार किलोमीटर अंतर विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. या एकमेव मेट्रो मार्गानंतर दुसऱ्या टप्प्यात निगडीच्या भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक ते चाकण असा दुसऱ्या मार्गाच्या आराखड्यावर खलबते सुरू झाली आहेत. भक्ती-शक्ती ते चाकण असा दुसऱ्या मार्गाच्या आराखड्यामध्ये एकूण ३१ मेट्रो स्टेशन आणि हा मार्ग उन्नत (एलिव्हेटेड) असणार होता. शहरात साडेसात किलोमीटर मार्गावर मेट्रो धावत असून, पिंपरी ते निगडी अशी साडेचार किलोमीटर मार्गावर मेट्रो धावण्यासाठी जून २०२७ उजाडणार आहे.




# विवाह मुहूर्त काढताच कशाला...?

**मुळात असे पंचांगातील मुहूर्त पाहून विवाह सोहळे आयोजित करणे आता बंद व्हायला हवे. या मुहूर्तांमुळे एक गंमत अशी होते की एका विशिष्ट अशा त्याच दिवशी आयोजित विवाह समारंभांची संख्या वाढते. परिणामी अनेकांना त्या दिवशीच्या मुहूर्तावर मंगल कार्यालय उपलब्ध होत नाही. दाट तिथी असल्याचे कारण पुढे करत मंगल कार्यालयाचे मालकही अव्वाच्या सव्वा पैसे वसूल करतात.**

एकाच दिवशी अनेक विवाह असल्याने अनेकांना काही विवाह समारंभांमध्ये पोहोचताही येत नाही. वेळ पाळायचीच नसेल तर अशा सर्वांसाठी आता मुहूर्त, तिथी वगैरे न पाहता आपल्या सोयीनुसार विवाह समारंभाची तारीख ठरविण्याची पद्धत रूढ व्हायला हवी.आपल्या संस्कृतीनुसार विवाहाचा संस्कार पार पाडण्यासाठी योग्य असा मुहूर्त काढण्यात येतो. तारीख, वार आणि विवाहाची वेळ कोणती असावी, या संदर्भातील विचार विनिमय पंचांग पाहून केला जातो. मात्र प्रत्यक्ष विवाह सोहळा पार पडतो तेव्हा या मुहूर्ताची पूर्ण ऐशी तैशी केली जाते. आलेल्या पाहुण्यांना पूर्णपणे मानसिक त्रास देण्याचा हा विषय असून सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही अशी अवस्था सर्वांची होऊन जाते. जर मुहूर्ताची वेळ पाळली जात नसेल तर विवाह सोहळ्याचा मुहूर्त काढताच कशाला, असा उद्वेग व्यक्त केल्याशिवाय पाहुणे मंडळींच्या हाती काही उरत नाही...मुहूर्तावर केलेला विवाह फार यशस्वी होतो अशातला



भाग नाही किंवा मुहूर्त टळून गेल्यानंतर विवाह पार पडला तर तो टिकत नाही अशातलाही भाग नाही.

पण तरीही मुहूर्त काढण्याचे सोपस्कार प्रत्येकच विवाह सोहळ्यात पार पाडले जातात. सोयरीक संबंध होतो त्यावेळी आवर्जून पंडिताला बोलावून विवाहाची तारीख आणि वेळ निश्चित केली जाते. संबंधितांची राशी, त्यांची जन्मतारीख वगैरे बघून पंचांगामधून ही वेळ निश्चित केली जाते. ज्यांचा या पंचांगावर विश्वास आहे ती मंडळीही प्रत्यक्ष विवाह सोहळ्याच्या वेळी मात्र या वेळेचे बंधन पाळत नाही. अलीकडच्या काळात विवाह सोहळ्यांचे स्वरूप पूर्णपणे बदललेले आहे. ठरलेल्या वेळी विवाह सोहळा पार पडण्यासाठी हे बदललेले स्वरूप मोठीच अडचण म्हणावी लागेल. त्यात मुख्य विषय असतो फोटो आणि व्हिडिओग्राफर यांचा. पार पडणारा हा विवाह सोहळा म्हणजे प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा क्षण असतो, दोन कुटुंबाचा मिलाप असतो. त्यामुळे प्रत्येक क्षण कॅमेऱ्यात टिपून ते संग्रही ठेवणे यात गैर काहीच नाही, परंतु विवाह सोहळ्याचे फोटो काढायचे की फोटो काढण्यासाठी विवाह करायचा असा संभ्रम निर्माण व्हावा अशी सध्याची परिस्थिती आहे. सोहळा पार पडत असताना तो आपल्या कॅमेऱ्यात टिपण्या ऐवजी कॅमेरामन सांगेल त्या पद्धतीने पावले टाकायची, त्या पद्धतीने पोज देणे आणि त्या पद्धतीने बाकी सगळ्या गोष्टी अरेंज करणे असा सगळा प्रकार असल्यामुळे सध्याचा कोणताही विवाह सोहळा वेळेवर लागूच शकत नाही, अशी परिस्थिती आहे.

परिणामी पत्रिकेमध्ये मुहूर्त टाकून बोलावलेल्या पाहुण्यांना मनस्ताप सहन केल्याशिवाय दुसरे काहीही मिळत नाही. असा मनस्ताप टाळायचा असेल तर एक तर आता पाहुण्यांनीच विवाह सोहळ्यांमध्ये आपल्या सोयीने जायला हवे किंवा पत्रिकांमध्ये मुहूर्ताची वेळ नमूद करणे बंद करायला हवे. अमुक अमुक दिवशी विवाह सोहळा आहे. सकाळी ११ ते ४ किंवा १२ ते ५ किंवा सायंकाळी ७ ते रात्री ११ या वेळेमध्ये केव्हाही या... वधू-वरांना शुभाशीर्वाद द्या आणि जेवणाचा आनंद घ्या अशा पद्धतीची सुधारणा करण्याची सध्या गरज निर्माण झाली आहे. सध्या विवाह सोहळ्यांचा सीजन जोरात सुरू आहे पण एखादा अपवाद वगळला तर कोणताच सोहळा पत्रिकेतील वेळेवर पार पडला असे दिसून येत नाही. अर्थात ज्याच्या घरी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे त्यांनी या सोहळ्यासाठी कितीही वेळ लागला तरी त्यांना फरक पडू शकत नाही. परंतु जी पाहुणे मंडळी आपला वेळ आणि पैसे खर्च करून या समारंभासाठी हजेरी लावतात त्यांची मात्र गैरसोय झाल्याशिवाय राहत नाही. ज्यांच्या वरील प्रेमापोटी आपण या मंडळींना विवाह सोहळ्यासाठी आमंत्रित करतो त्यांना आनंद मिळणे ऐवजी त्यांची गैरसोय झाल्याने त्यांना मनस्ताप होत असेल तर याचा विचार आता प्रत्येकाने करण्याची गरज आहे अशी होते की एका विशिष्ट अशा त्याच दिवशी आयोजित विवाह समारंभांची संख्या वाढते. परिणामी अनेकांना त्या दिवशीच्या मुहूर्तावर मंगल कार्यालय उपलब्ध होत नाही. दाट तिथी असल्याचे कारण पुढे करत मंगल कार्यालयाचे मालकही अव्वाच्या सव्वा पैसे वसूल करतात.

## प्रासंगिक »

### बॉश फर्नांडिस

***मेक्सिकोच्या फातिमा बॉश फर्नांडिस हिने 'मिस युनिव्हर्स २०२५'चा झगमगता मुकुट परिधान करून इतिहास घडवला.***

जगभरातील १०० हून अधिक देशांच्या सौंदर्यवतींशी अत्यंत कडाक्याची स्पर्धा करत फातिमाने हे यश संपादन केले. अंतिम फेरीत तिने थायलंडच्या प्रविणार सिंग हिचा पराभव करून तिला उपविजेतेपदावर समाधान मानण्यास भाग पाडले. फातिमाचा हा विजय केवळ बाह्य सौंदर्याचा नसून, तिच्या असामान्य बुद्धिमत्तेचा आणि संघर्षाचा विजय आहे.

फातिमाचा जन्म १९ मे २००० रोजी मेक्सिकोच्या तबास्को राज्यातील 'टियापा' गावी झाला.शालेय वयात तिला 'डिस्लेक्सिया' आणि 'एडीएचडी' या समस्यांचे निदान झाले होते. डिस्लेक्सियामुळे तिला वाचन आणि अक्षरे ओळखण्यात अडचण येत असे, तर एडीएचडीमुळे एकाग्रतेचा अभाव आणि अतिचंचलता यांसारख्या समस्या होत्या. मात्र, याला आपली कमजोरी न मानता तिने जिद्दीने शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले.

शिक्षक रक्षक होण्यासाठीच्या पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय हाती शिक्षणशास्त्र पदविका अथवा पदवी असूनही नोकरीची संधी मिळत नाही. त्यामुळे ही परीक्षा अधिक महत्त्वाची ठरते आहे. या परीक्षेच्या निकालाचे प्रमाण गेली अनेक वर्षे सातत्याने कमी आहे.

# शिक्षणाच्या पेपरवर गैरप्रकारांचा डाग

पातळी लक्षात घेता काही विद्यार्थ्यांनी वाम मार्गाचा विचार केला. त्यांच्या या मानसिकतेचा लाभउठवत काहींनी प्रश्नपत्रिका फोडण्याचा प्रयत्न केला. त्यातून लाखो रुपयांची संपत्ती मिळवल्याचे समोर येत चालले आहे. अशा घटनांमुळे शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याचा धोका आहे. त्यामुळे प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांमध्ये नैराश्य निर्माण होण्याचा धोका आहे.एकतर गेली काही वर्षे शिक्षण क्षेत्रात भरतीची प्रक्रिया नाही. त्यामुळे शिक्षणशास्त्र पदविका आणि पदवी अभ्यासक्रमांची अनेक विद्यालये, महाविद्यालये बंद करावी लागली आहेत. असे असताना ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन पदवी प्राप्त केली आहे आणि नोकरीची संधी मिळेल अशी अपेक्षा आहे, अशा विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास उडाला, तर त्याचा परिणाम समाज म्हणून सर्वांनाच भोगावा लागेल. हा अविश्वास शिक्षणाच्या गुणवत्तेवर प्रश्न निर्माण करेल. तसचे शिक्षणातून परिवर्तनाची अपेक्षा तरी कशी ठेवणार?



शिक्षण हे व्यक्तिगत जीवन उन्नतीसाठी जितके महत्त्वाचे आहे, तितकेच ते समाज परिवर्तनासाठी महत्त्वाचे आहे. शिक्षण विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. त्या माध्यमातून राष्ट्र घडत असते; मात्र आज शिक्षणाचे मोल, पावित्र्य संपवण्याचा प्रयत्न यांसारख्या घटनांमुळे घडतो आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्याची देशात दि. १ एप्रिल २०१० पासून अंमलबजावणी सुरू झाली. यातील तरतुदीप्रमाणे शिक्षक पात्रता परीक्षा इयत्ता पहिली शिक्षक पात्रता प्रवेश परीक्षेचा पेपर फोडण्याचे प्रकरण गाजत आहे. ज्यांनी शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्याबरोबर मूल्यांचा विचार पेरायचा तेच या गैरप्रकारात सहभागी होत आहेत. शिक्षणावरील विश्वास उडत गेला, तर शिक्षणातून समाज परिवर्तनाच्या अपेक्षांना सुरुंग लागेल. ते आठवीच्या वर्गांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना सेवेत येण्यासाठी पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली. शिक्षक पात्रता म्हणून नियमित पदव्यांसोबत पात्रता परीक्षा अनिवार्य केल्यानंतर देशात केंद्र सरकारच्या आणि विविध राज्य सरकारांच्या वतीने शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली. अर्थात, पहिल्यांदाच राष्ट्रीय प्रवेश परीक्षेला लाखो विद्यार्थी प्रविष्ट झाली होती; मात्र त्या परीक्षेचा निकाल अवघा एक टक्क्याच्या दरम्यान लागला होता. त्यामुळे परीक्षा सहजपणे उत्तीर्ण होता येत नाही, हे समोर आले. त्यापाठोपाठ राज्य सरकारच्या वतीनेदेखील प्रवेश पात्रता परीक्षेची जबाबदारी ही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यास सुरुवात झाली. त्याही परीक्षेला लाखोने विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्याही परीक्षेचा निकाल तीन ते पाच टक्क्यांच्या दरम्यान लागला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

आधी मनपाची रणधुमाळी

## जिपच्या तुलनेत मनपात आरक्षण मर्यादा भंग कमी

# झेडपी अगोदर मनपा निवडणुका ?

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या तुलनेत महापालिकेत आरक्षण मर्यादा भंग कमी असल्याने आधी महापालिका निवडणुकांचा बार उडवून देण्याचा सोयीचा विचार राज्य निवडणूक आयोग करीत असल्याने आता आधी मनपाची रणधुमाळी सुरु होण्याची शक्यता आहे.**

### सर्व पालिका आयुक्तांसोबत बैठक






### म्हणून मनपा निवडणुका शक्य

३१ जानेवार-अखेर घेण्याचेआव्हान राज्य निवडणूक आयोगसमोर आहे. आयोगाने पहिल्या टप्प्यात २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका घोषित झाल्या. मात्र, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय २३ नोव्हेंबरनंतर आल्याने या निवडणुकांचे मतदान २ डिसेंबर आणि २० डिसेंबर असे दोन टप्प्यांत विभागले गेले.

नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांनंतर दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्याऐवजी राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा बार उडवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी गुरुवारी दुपारी राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या आयुक्तांची तातडीने बैठक बोलावल्याने जिल्हा परिषदांपूर्वी महापालिका निवडणुका घेतल्या जाऊ शकतात, असा अंदाज बांधला जात आहे. दुसऱ्या टप्प्यात महापालिका निवडणुका जाहीर केल्यास तशी महापालिका आयुक्तांची आणि त्यांच्या प्रशासनांची तयारी आहे का, हे सर्व गुरुवारी दूरदृष्य प्रणालीद्वारे होणाऱ्या आयुक्तांच्या बैठकीत तपासले जाईल. आयुक्तांनी अनुकूल कल दिल्यास सूत्रांच्या अंदाजानुसार, १५ ते २० डिसेंबरदरम्यान राज्य निवडणूक आयोगाकडून २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या डेडलाईननुसार, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या ३१ जानेवार-अखेर घेण्याचेआव्हान राज्य निवडणूक आयोगसमोर आहे. आयोगाने पहिल्या टप्प्यात २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका घोषित झाल्या. मात्र, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय २३ नोव्हेंबरनंतर आल्याने या निवडणुकांचे मतदान २ डिसेंबर आणि २० डिसेंबर असे दोन टप्प्यांत विभागले गेले. २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदाच्या आणि सदस्यपदांच्या निवडणुका २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आल्या. नागपूर खंडपीठाच्या निर्णयानुसार या दोन्ही मतदानांची मतमोजणी आता २१ डिसेंबरला होईल.निवडणुकांच्या पहिल्याच टप्प्यातील मतदान दोन टप्प्यांत घेऊन निवडणूक आयोगाने अभूतपूर्व गोंधळ उडवून दिल्याने आरक्षणाचा मोठा वाद असलेल्या जिल्हा परिषद निवडणुकांना इतक्यात सामोरे जाण्याच्या मनःस्थितीत राज्य निवडणूक आयोग नाही. स्थानिक निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषदांऐवजी राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या निवडणुका घेण्याचा विचार आयोग करत असल्याचे समजते. महापालिका आयुक्तांचा कल जाणून घेऊनच याबद्दलचा निर्णय घ्यावा यासाठी गुरुवारी सर्व पालिका आयुक्तांची ऑनलाईन बैठक बोलावण्यात आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या तुलनेत महापालिकेत आरक्षण मर्यादा भंग कमी असल्याने आधी महापालिका निवडणुकांचा बार उडवून देण्याचा सोयीचा विचार राज्य निवडणूक आयोग करीत असल्याने आता आधी मनपाची रणधुमाळी सुरु होण्याची शक्यता आहे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्याऐवजी राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा बार उडवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी गुरुवारी दुपारी राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या आयुक्तांची तातडीने बैठक बोलावल्याने जिल्हा परिषदांपूर्वी महापालिका निवडणुका घेतल्या जाऊ शकतात, असा अंदाज बांधला जात आहे. दुसऱ्या टप्प्यात महापालिका निवडणुका जाहीर केल्यास तशी महापालिका आयुक्तांची आणि त्यांच्या प्रशासनांची तयारी आहे का, हे सर्व गुरुवारी दूरदृष्य प्रणालीद्वारे होणाऱ्या आयुक्तांच्या बैठकीत तपासले जाईल. आयुक्तांनी अनुकूल कल दिल्यास सूत्रांच्या अंदाजानुसार, १५ ते २० डिसेंबरदरम्यान राज्य निवडणूक आयोगाकडून २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊ शकतो.

# मुंबईकरांच्या वाहन संख्येत भलीमोठी वाढ!

## मुंबईत एकूण वाहनांची संख्या 53 लाखांच्या घरात

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईत गेल्या १९ वर्षांत मुंबईत तब्बल ३० लाख नवीन वाहनांची भर पडली असून, शहरातील एकूण वाहनसंख्या आता ५३ लाखांच्या पुढे गेली आहे. वाहनांची वाढती संख्या आणि रस्त्यांवरील रोजची कामे यामुळे मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या तीव्र होत चालली आहे.**



### उपायांची तातडीची गरज

जागतिक दर्जाचे शहर असलेल्या मुंबईत सुमारे २००० किलोमीटर रस्ते आहेत; परंतु त्यापैकी जवळपास २५% रस्त्यांवर कामे सुरू असल्याने शहरातील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. अंदाजे ४०० प्रकल्पांमुळे मुंबईकरांना अंतर पार करण्यास साधारण ७५% अधिक वेळ लागत आहे.

सध्या मुंबईत प्रत्येक किलोमीटर रस्त्यावर २५०० हून अधिक वाहनांचा भार आहे. दहा वर्षांपूर्वी शहरातील वाहनसंख्या २३ लाख ३१ हजार इतकी होती. जागतिक दर्जाचे शहर असलेल्या मुंबईत सुमारे २००० किलोमीटर रस्ते आहेत; परंतु त्यापैकी जवळपास २५% रस्त्यांवर कामे सुरू असल्याने शहरातील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. अंदाजे ४०० प्रकल्पांमुळे मुंबईकरांना अंतर पार करण्यास साधारण ७५% अधिक वेळ लागत आहे. मुंबईतील वाहनांची संख्या शहराच्या क्षमतेपेक्षा जवळजवळ दुप्पट आहे. त्यामुळे वायू आणि ध्वनी प्रदूषणात चिंताजनक वाढ होत आहे. पेट्रोल आणि डिझेल वाहनांची संख्या CNG वाहनांच्या तुलनेत जास्त असल्याने हवेतून प्रदूषक कणांचे प्रमाण वाढत आहे. वाहतूक कोंडीत सतत वाजणारे हॉर्नदेखील ध्वनी प्रदूषण तीव्र करतात आणि त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.मुंबईतील एकूण वाहनांपैकी ८८% वाहने खासगी आहेत. यात ५९.३४% दुचाकी आणि २८.७२% चारचाकी/कार-जीप यांचा समावेश आहे. याउलट सार्वजनिक वाहतुकीत बसचे प्रमाण केवळ १% असून, ही मोठी असमतोल स्थिती वाहतूक व्यवस्थेला आणखी बोजा देत आहे.वाहनवाढ नियंत्रित करण्यासाठी तज्ज्ञांनी गर्दी शुल्क (CONGESTION CHARGE), वाहन खरेदीसाठी लॉटरी सिस्टम, मजबूत पार्किंग धोरण, आणि कार शेअरिंगला प्रोत्साहन देण्यासारखे उपाय सुचवले आहेत. शहरातील वाहतूक वेग सध्या १०–२० किमी प्रतितास इतका कमी झाला असून, परिस्थिती सुधारण्यासाठी कठोर पावले उचलणे अत्यावश्यक आहे. मुंबईत गेल्या १९ वर्षांत मुंबईत तब्बल ३० लाख नवीन वाहनांची भर पडली असून, शहरातील एकूण वाहनसंख्या आता ५३ लाखांच्या पुढे गेली आहे. वाहनांची वाढती संख्या आणि रस्त्यांवरील रोजची कामे यामुळे मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या तीव्र होत चालली आहे. सध्या मुंबईत प्रत्येक किलोमीटर रस्त्यावर २५०० हून अधिक वाहनांचा भार आहे.

पुतीन यांची दिल्ली वारी

## व्लादिमीर पुतिन दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर

# मोदी-पुतिन उद्या द्विपक्षीय चर्चा करणार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन (VLADIMIR PUTIN) हे दोन दिवसीय दौऱ्यासाठी आज (गुरुवार) भारतात दाखल झाले. दिल्लीच्या पालम विमानतळावर पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) यांनी पुतिन यांची गळाभेट घेऊन त्यांचे जंगी स्वागत केले. राष्ट्राध्यक्ष पुतिन हे ५ डिसेंबर रोजी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत २३ वी भारत-रशिया वार्षिक शिखर परिषद घेणार आहेत.**

## मुंबई पासिंगच्या कारमध्ये पुतिन!



स्वागत समारंभानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन पालम टेक्निकल एअरपोर्टवरून एकाच कारमध्ये बसून निघाले. यावेळी, दिल्लीत दाखल झालेल्या पुतिन यांच्या प्रवासातून एक खास 'मुंबई कनेक्शन' समोर आले, ज्यामुळे मोठी चर्चा सुरू झाली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन दिल्लीच्या पालम एअरपोर्टवरून ज्या कारमध्ये बसून निघाले, ती कार मुंबई पासिंगची (MUMBAI PASSING) होती. त्या कारची नंबर प्लेट MH 01 EN 5795 अशी होती. पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानी दोन्ही नेत्यांचे रात्रीचे भोजन (डिनर) झाले. पुतिन यांच्या स्वागतासाठी पंतप्रधान मोदी आधीच पालम एअरपोर्टवर उपस्थित होते. पुतिन पोहोचताच मोदींनी त्यांचे अतिशय उत्साहाने स्वागत केले. त्यानंतर दोन्ही नेते एकाच गाडीतून थेट पंतप्रधान निवासस्थानाकडे रवाना झाले.राष्ट्राध्यक्ष पुतिन यांचा हा दौरा भारत-रशिया धोरणात्मक संबंधांच्या २५ व्या वर्षगांठनिमित्त होत आहे. सन २००० मध्ये पुतिन आणि तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी धोरणात्मक भागीदारी करारावर स्वाक्षरी करून या संबंधांची मजबूत पायाभरणी केली होती. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आज गुरुवारी (०४ जुलै ) रोजी नवी दिल्लीत येणार आहेत, ते दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. भारताने पुतिन यांच्या स्वागतासाठी अनेक कार्यक्रमांचे नियोजन केले आहे, यामध्ये खाजगी जेवण, राज्य मेजवानी, उच्चस्तरीय द्विपक्षीय चर्चा आणि सीईओंना संबोधित करणे यांचा समावेश आहे. दरम्यान, युरोपीय देश भारताला युक्रेन युद्ध संपवण्यासाठी रशियावर दबाव आणण्याचा आग्रह करत आहेत. अमेरिका आणि युरोप भारतावर रशियन तेल खरेदी कमी करण्यासाठी सतत दबाव आणत आहेत, कारण यामुळे पुतिन यांच्या "युद्ध यंत्राला" निधी मिळतो. तर दुसरीकडे आज जगाचे लक्ष मोदी आणि पुतिन यांच्या भेटीवर आहे.२०२२ मध्ये युद्ध सुरू झाल्यापासून, मोदी आणि पुतिन यांनी १६ वेळा संवाद साधला आहे. २०२२ ते २०२४ दरम्यान ११ वेळा आणि २०२५ मध्ये फक्त पाच वेळा. सप्टेंबर २०२२ मध्ये उझबेकिस्तानमधील समरकंद येथे झालेल्या एससीओ शिखर परिषदेदरम्यान, पंतप्रधान मोदींनी प्रथम पुतिन यांना सांगितले, "आज युद्धाचा काळ नाही." जुलै २०२४ मध्ये मॉस्को भेटीदरम्यान, मोदींनी पुनरुच्चार केला, "युद्धभूमीवर उपाय सापडत नाहीत."मिळालेल्या माहितीनुसार, या भेटीदरम्यान पुतिन यांनाही पीएम मोदी असाच संदेश देणार आहेत. पण, युक्रेन, रशिया, युरोप आणि अमेरिका या चारही पक्षांनी वाटाघाटीच्या टेबलावर एकत्र येऊन तोडगा काढणे शक्य आहे. भारताने यापूर्वी शांतता प्रयत्नांमध्ये भूमिका बजावली आहे - झापोरिझिया अणुऊर्जा प्रकल्पाच्या सुरक्षेबाबत रशियाशी वाटाघाटी करणे आणि रशिया-युक्रेन धान्य करारात "शांतपणे" मदत करणे.पुतिन हे दोन दिवसीय दौऱ्यासाठी आज भारतात दाखल झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुतिन यांची गळाभेट घेऊन त्यांचे जंगी स्वागत केले. राष्ट्राध्यक्ष पुतिन हे ५ डिसेंबर रोजी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत २३ वी भारत-रशिया वार्षिक शिखर परिषद घेणार आहेत.

### युरोपने भारताला केले आवाहन

काही दिवसापूर्वी ब्रिटन, जर्मनी आणि फ्रान्सच्या राजदूतांनी रशियावर टीका केली. पोलंडचे परराष्ट्र सचिव व्लादिस्लाव तेओफिल बार्टोस्झेव्स्की म्हणाले, "मला आशा आहे की पंतप्रधान मोदी पुतिन यांना शांतता करारावर स्वाक्षरी करण्यास सांगतील. हे युद्ध सुरू राहणे तुमच्या, आमच्या किंवा जगाच्या हिताचे नाही. पुतिन पंतप्रधान मोदींचे ऐकतात, असंही ते म्हणाले.

# दंतेवाडा: आतापर्यंत 16 नक्षलवादी ठार

## दंतेवाडा-बिजापूर सीमेवरतीन पोलीस शहीद; एके-47 शस्त्रसाठा जप्त

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**काही दिवसांपासून सुरु असलेल्या छत्तीसगडच्या बिजापूर-दंतेवाडा सीमेवर सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये मोठी चकमक उडाली आहे. छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील बस्तर रेंजमध्ये सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांवर निर्णायक कारवाई सुरू केली आहे. बिजापूर-दंतेवाडा जिल्हा सीमेवर असलेल्या पश्चिम बस्तर विभाग परिसरात सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान सुरक्षा दल आणि ~~माओवाद्यांमध्ये चकमक झाली.~~**

3 डिसेंबर रोजी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी १२ माओवाद्यांना ठार मारले. या चकमकीत बीजापूर डीआरजीचे तीन जवानही शहीद झाले. सुरक्षा दलांनी ही कारवाई एका नवीन रणनीतीअंतर्गत केली असल्याची माहिती समोर आली. या शोध मोहिमेदरम्यान सैनिकांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त केला. ज्यामध्ये एसएलआर रायफल्स आणि .303 रायफल्सचा समावेश होता. पश्चिम बस्तर विभागात मोठ्या संख्येने नक्षलवादी उपस्थित असल्याची माहिती सैनिकांना मिळाली होती, ज्यामुळे ही कारवाई करण्यात आली. दंतेवाडा आणि बिजापूरच्या सीमेवर



असलेल्या भैरामगड पोलिस स्टेशन परिसरातील केशकुतुल गावात डीआरजी, एसटीएफ, सीआरपीएफ आणि इतर कर्मचारी नक्षलवाद्यांच्या शोधात निघाले होते, जिथे चकमक झाली.ही चकमक अधूनमधून सुरू राहिली, त्यात तीन डीआरजी सैनिक ठार झाले आणि इतर दोन जखमी झाले. तर १२ नक्षलवादी ठार झाले. तथापि, गुरुवारी सकाळी पुन्हा सुरू झालेल्या शोध मोहिमेदरम्यान, आणखी तीन नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले. दंतेवाडा आणि विजापूरच्या सीमेवर असलेल्या भैरामगड पोलीस स्टेशन परिसरातील केशकुतुल गावात डीआरजी, एसटीएफ, सीआरपीएफ आणि इतर कर्मचाऱ्यांचे संयुक्त पथक नक्षलवाद्यांचा शोध घेत होते. दरम्यान, सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. ही चकमक सायंकाळपर्यंत अधूनमधून सुरू राहिली. या सुरुवातीच्या चकमकीत डीआरजीचे तीन जवान शहीद झाले आणि इतर दोन जण जखमी झालेसकाळी पुन्हा सुरू झालेल्या शोध मोहिमेदरम्यान, आणखी तीन नक्षलवाद्यांचे मृतदेह जप्त करण्यात आले, ज्यामुळे नक्षलवाद्यांचा मृतांचा एकूण आकडा १५ झाला.

### शोध मोहीम आणि शस्त्रे जप्त

दारूगोळा जप्त केला, ज्यामध्ये एलएमजी मशीन गन, एके-४७ रायफल, एसएलआर रायफल, आयएनएएसएएस रायफल, ३०३ रायफल आणि इतर शस्त्रे यांचा समावेश आहे. शहीद जवानांची ओळख पटली आहे. हेड कॉन्स्टेबल मोनू वदारी, कॉन्स्टेबल दुकारू गोंडे आणि रमेश सोडी, डीआरजी, विजापूर, हे विजापूर जिल्ह्यातील अवपल्ली पोलिस स्टेशन परिसरातील रहिवासी आहेत.

# धनुषपेक्षा मुरारीच्या कॅमिओची जास्त चर्चा

2013 साली रिलीज झालेला RAANJHANAA आजही तितक्याच आवडीने पहिला जातो. धनुषचा पहिला चित्रपट, वाराणसीची सुंदरता, उत्तम कथानक आणि तितकेच मधुर संगीत यामुळे हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरला. यातही कुंदन या पात्रासोबतच मुरारी हे पात्र देखील प्रेक्षकांच्या मनात घर करून बसले. म्हणूनच जेव्हा TERE ISHQ MEIN चित्रपटाची घोषणा झाली तेव्हा रांझना मधील पात्र पाहायला मिळणार का? असा प्रश्न प्रेक्षकांच्या मनात होता.तेरे इश्क में हा चित्रपट रांझनापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. मात्र, जेव्हा चित्रपटातील नायक शंकर आपल्या वडिलांच्या अंतिम संस्कारासाठी वाराणसीला येतो. तेव्हा, तिकडे त्याची भेट मुरारी सोबत होते. तेव्हा मुरारी शंकरला त्यांच्या मित्राबद्दल म्हणेजच कुंदनबद्दल सांगतो. 'प्यार में मृत्यू है, मोक्ष नहीं" हा मुरारीचा डायलॉग सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतोय. शंकर आणि मुरारीच्या संभाषणादरम्यान 'तुम तक' गाण्याचे म्युझिक बॅकग्राऊंडला वाजते. ज्यामुळे हा सिन अजून उठावदार झाला आहे. तसेच झीशान अय्यूबला पुन्हा एकदा मुरारीच्या रूपात पाहिल्याने रांझना चित्रपटाचा चाहता वर्ग खुश झाला आहे. अभिनेता झीशान अय्यूब यांनी 'अमर उजाला'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या अपार प्रेमामुळे ते खूप भारावून गेले आहेत. सतत येणारे मेसेज आणि फोन पाहून त्यांना त्यांच्या 'रांझणा' चित्रपटाच्या वेळेस मिळालेल्या प्रतिसादाची आठवण झाली. यावेळी त्यांना अधिक प्रेम मिळत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आणि ते यासाठी खूप खूश व आभारी आहेत. धनुषसोबतच्या आपल्या खास नात्याबद्दल बोलताना ते म्हणाले की, ते दोघे फक्त मित्र नसून भाऊ आहेत. धनुषने मस्करीत फोन करून सांगितले की, मी पूर्ण सिनेमा केला आणि तू फक्त एक सिन. मात्र, प्रेक्षक तुझेच कौतुक जास्त करत आहे. शूटिंगच्या वेळी भेट झाल्यावर आम्ही दोघांनीही एकमेकांना प्रेमाने मिठी मारली. इतक्या वर्षानंतर भेटल्याने आमच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. चित्रपटातील हा भावनिक क्षण पाहून दिग्दर्शक आनंद एल. राय यांनी लगेच अंदाज वर्तवला होता की हा सीन नक्कीच हिट होणार. अपेक्षेनुसार, 'मुरारी'ची भूमिका जिवंत करणारा तो सीन थेट प्रेक्षकांच्या हृदयाला भिडला आणि प्रचंड गाजला.

# त्यांच्यामुळे मला माझ्या बाबांची उणीव भासत नाही



अभिनेत्री सायली संजीवने नुकतंच नवराष्ट्रच्या पडद्यामागचे कलाकार या पॉडकास्टला हजेरी लावली होती. या पॉडकास्टमध्ये सायली वडिलांच्या आठवणीने काहीशी भावूक झाली. सायली म्हणाली की, तिच्या वडिलांना जाऊन चार वर्ष झाली पण एकही दिवस असा गेला नाही की, वडिल स्वप्नात आले नाहीत. काही बोलायचं बाकी राहिलेलं नाही कारण ते रोजच स्वप्नात येतात आणि मी त्यांच्याशी स्वप्नात बोलतच असते. पण मला माझ्या बाबांना एवढंच सांगायचं आहे की, माझं तुमच्यावर खूप प्रेम आहे आणि तुम्हाला अभिमान वाटेल असंच काम मी कायम करत राहीन, अशा शब्दात तिने तिच्या भावना फोनच्या माध्यमातून व्यक्त केल्या.बाबांबद्दल बोलत असताना तिने अशोक सराफ ,निवेदिता सराफ आणि तिच्या नात्याबाबत देखील खुलासा केला. सायली म्हणते की, माझ्या बाबाची जागा कोणीच घेऊ शकत नाही पण माझ्या आयुष्यात असे काही वडिलधारी व्यक्ती आहेत जे मला माझ्या बाबाची उणीव भासू देत नाही. त्या व्यक्तिंपैकी एक म्हणजे अशोक सराफ. कॅमेऱ्यासमोर मुलाखत देताना मी त्यांना अशोक सर म्हणते पण वैयक्तिक आयुष्यात मी त्यांना पप्पा अशीच हाक मारते. आमच्यात खूप छान गप्पा रंगतात. मी जेवढं माझ्या बाबांना घाबरत नव्हते तेवढं मी अशोक सरांना घाबरते. ते मला कायमच काळजीने दटावतात. तू किती बाहेर फिरते, ऐकत नाहीस तू आणि निवेदिता अगदी सारख्याच आहात. ती सुद्धा काहीच ऐकत नाही. मग त्यावर मी असं म्हणते की, तुम्ही माझ्या वयात असताना ही असंच केलंत ना पप्पा. सगळेच तसं वागतात, असा गमतीशीर किस्सा सायलीने सांगितला. यापुढे देखील सायली म्हणते की, मी स्वत:ला खूप नशिबवान समजते की, अशी काळजी करणारे काळजी घेणारी माणसं माझ्या आयुष्यात आहेत.

# सुधीर दळवी यांची मृत्यूशी झुंज

टीव्हीवर साईबाबांची भूमिका साकारून अभिनेता सुधीर दळवी यांनी खूप प्रसिद्धी मिळवली. आता गेल्या काही काळापासून त्यांच्या आरोग्याच्या समस्यांमुळे चर्चेत आहे. अभिनेते खूप कठीण काळातून जात आहेत आणि त्यांना सेप्सिस इन्फेक्शन झाले आहे. त्यांच्या कुटुंबाने त्यांच्या उपचारांसाठी आर्थिक मदत मागितली होती. आता, अभिनेत्याच्या कुटुंबाला दिलासा मिळाला आहे. शिर्डी संस्थान त्यांना मदत करण्यासाठी पुढे आले आहे आणि मुंबई उच्च न्यायालयाने त्यांची मंजुरी दिली आहे.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सुधीर दळवी यांना आर्थिक मदत मंजूर केली आहे. टीव्ही अभिनेता सुधीर दळवी सध्या गंभीर आजाराशी झुंजत आहेत आणि त्यांच्याकडे उपचारांसाठी पैसे नाहीत. ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांच्या "साई बाबा ऑफ शिर्डी" या चित्रपटात त्यांनी साईबाबांची भूमिका साकारली होती, ज्यामुळे ते घराघरात लोकप्रिय झाले.

# पण मी खूश नाही

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे मराठमोळी निक्की तांबोळी घराघरांत पोहोचली. निक्कीने काही दाक्षिणात्य चित्रपटही केले आहेत. आता ती 'सेलिब्रिटी मास्टरशेफ'मधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या शोचा एक प्रोमो व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये निक्की ढसाढसा रडताना दिसत आहे, त्यामुळे निक्कीला नेमकं झालंय तरी काय? असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. सोनी टीव्हीच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरून 'सेलिब्रिटी मास्टरशेफ'चा एक प्रोमो शेअर करण्यात आला आहे, ज्यामध्ये ती रडताना दिसते. "मागील तीन वर्षांत मी हिट रिॲलिटी शो दिले आहेत, पण तरीही मी खूश नाहीये. मी आनंद शोधतेय," असं निक्की रडत रडत म्हणते. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी यांच्या डोळ्यांतही पाणी येतं. त्यानंतर शेफ रणवीर ब्रार व फराह खान निक्कीशी बोलताना दिसतात. निक्कीला ती काय बनवतेय, असं ते विचारतात. त्याचं निक्की उत्तर देते. यावेळी निक्की गोंधळलेली दिसते. चिप्स कुठे आहेत, असं रणवीर तिला विचारतात. त्यावर ती बनवू शकली नाही असं उत्तर देते. हे ऐकून फराह खान व विकास खन्ना यांना धक्का बसतो.पुढे निक्की रडत म्हणते, "मी खूप मेहनत करतेय, मला शो मिळत आहेत, पण मी खूश नाहीये. कधी कधी मला वाटतं की मी या सगळ्या गोष्टींसाठी पात्र नाही." निक्कीचं बोलणं संपल्यावर हा प्रोमो संपतो. निक्की नेमकी कशामुळे रडते, काय घडलंय, ते एपिसोड प्रसारित झाल्यावरच कळेल.निकी तांबोळीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तिने मॉडेल म्हणून करिअरची सुरुवात केली होती. २०१९ मध्ये, तिने 'चिकाती गडिलो चिथाकोटुडू' या तेलुगू हॉरर कॉमेडी चित्रपटातून अभिनयात पदार्पण केलं होतं.



# अक्षय मुडावदकर यांनी अक्कलकोटला घेतले स्वामींचे दर्शन!

दत्तजयंतीच्या मुहूर्तावर कलर्स मराठी वाहिनीवर 'जय जय स्वामी समर्थ' या मालिकेत खास भागांचे आयोजन करण्यात आले आहे. ही मालिका चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेला प्रेक्षकांचं भरभरून प्रतिसाद आणि प्रेम मिळत आहे. 'जय जय स्वामी समर्थ ' या मालिकेमध्ये अभिनेता अक्षय मुडावदकर यांनी स्वामींची मुख्य भूमिका साकारली आहे. आज त्यांनी दत्त जयंतीनिमित्त अक्कलकोटला स्वामींचे दर्शन घेतले आहे.दत्तजयंतीच्या मुहूर्तावर कलर्स मराठी प्रेक्षकांसाठी एक भव्यदिव्य, भावपूर्ण आध्यात्मिक कथा दत्तजयंती विशेष सप्ताहाच्या स्वरूपात घेऊन आली आहे. याच दत्त जयंती विशेष भागाच्या निमित्ताने मालिकेतील प्रमुख कलाकार अक्षय मुडावदकर यांनी अक्कलकोटला भेट देत स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. मालिकेचे हे सगळे भाग ४ ते १० डिसेंबरला प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत. या विशेष भागात स्वामी समर्थांच्या दत्त अवताराचं





रहस्य, त्यांच्या भक्त कृपा, लीला आणि ब्रह्मा–विष्णू–महेश या त्रिदेवांच्या शक्तींचा एकत्रित अनुभव साकार करतील. दत्त म्हणजे उत्पत्ती, पालन आणि संहार यांचा परम संगम आणि या तीन शक्तींचं दिव्य प्रगटीकरण प्रेक्षकांना प्रथमच एका सलग कथेत आठवडाभर विस्ताराने अनुभवायला मिळणार आहे. या विशेष अनुभवाबद्दल बोलताना अक्षय मुडावदकर म्हणाले, "स्वामींचं दर्शन घेतल्यावर मनात अपरंपार समाधान आणि ऊर्जा मिळते. प्रेक्षकांकडून आणि स्वामी भक्तांकडून आतापर्यंत उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. स्वामींवर श्रद्धा आणि विश्वास ठेवला की त्यांच्या कृपेचा स्पर्श नक्कीच लाभतो. आज माझ्या हस्ते प्रसाद वितरण झालं, वातावरण संपूर्ण भक्तिमय झालेचे दिसले. योग्य दिवशी हा योग आला आणि मी अक्षरशः भावनेने भारावून गेलो. स्वामी समर्थ महाराजांचं सदैव ऋणी आहे, यंदा स्वामी समर्थांच्या दत्त अवताराचं रहस्य आम्ही मालिकेत उलगडणार आहोत, त्या पार्श्वभूमीवर हा योग जुळून येणे अलौकिक गोष्ट आहे." असे अभिनेत्याने म्हटले.मालिकेची ही विशेष कथा रंजना नावाच्या एका तरुणीच्या संघर्षमय आयुष्याभोवती फिरते, जिथे काका-काकूंचा छळ, भावाचा जीवघेणा आजार आणि गावगुंड अभिरामच्या अत्याचारामुळे तिचं आयुष्य उद्ध्वस्त झालेलं दिसतं.

## रूटने शतक झळकवले

## रूटने फटकावले ऑस्ट्रेलियातील पहिले कसोटी शतक

# जो रूटचा ब्रिस्बेन कसोटीत तडाखा!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील ॲशेस मालिका २०२५ मधील दुसरा कसोटी सामना ब्रिस्बेनमधील गॅबा स्टेडियमवर गुलाबी चेंडूने खेळवण्यात येत आहे. नाणेफेक जिंकून इंग्लंडने प्रथम फलंदाजी करत पहिल्या दिवसाअखेर ९ बाद ३२५ धावा केल्या आहेत. इंग्लंडकरून जो रूटने शानदार शतक झळकवले आहे. त्याने या शतकासह ऑस्ट्रेलियन भूमिवर एक कारनामा रचला आहे. त्याबाबद्दल आपण जाणून घेऊया.**

## रूटने स्मिथला टाकले पिछाडीवर




नाणेफेक जिंकून इंग्लंडने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु त्याची सुरुवात खूपच निराशाजनक झाली. संघाने आपले पहिले दोन बळी फक्त ५ धावांमध्ये गमावले. इंग्लंड संघ जेव्हा संकटात सापडला होता तेव्हा जो रूटने एक बाजू सांभाळत संघाला चांगल्या स्कोअरपर्यंत पोहचवले. जो रूटने शतकासह इंग्लंडला कठीण परिस्थितीतून बाहेर काढण्यात मोठी भूमिका बजावली.दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या डावात जो रूटने त्याचे ४० वे कसोटी शतक झळकावले. उल्लेखनीय बाब म्हणजे, ऑस्ट्रेलियातील हे त्याचे पहिलेच शतक देखील ठरले. जो रूटची ॲशेस २०२५ ची सुरुवात त्याच्यासाठी चांगली झाली नव्हती, कारण त्याला पर्थ कसोटीत फलंदाजीने चांगली कामगिरी करता आलेली नाही. ब्रिस्बेनमध्ये खेळल्या जात असेलल्या सामन्यात, त्याने त्याच्या सर्व टीकाकारांना आपल्या बॅटने चोख उत्तर दिले आणि ऑस्ट्रेलियामध्ये त्याची दीर्घ प्रतीक्षा एका शानदार शतकाने यशस्वीरित्या संपुष्टात आणली.जॉ रूट आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) मध्ये घराबाहेर सर्वाधिक शतके ठोकणारा फलंदाज ठरला आहे. त्याने परदेशात एकूण नऊ शतके झळकवली आहेत.

ज्यामुळे त्याने आता ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज स्टीव्ह स्मिथला मागे टाकले आहे. स्मिथ आठ शतके ठोकली आहेत.जो रूटची कामगिरी केवळ इंग्लंडसाठी महत्त्वपूर्ण राहिली नाही तर त्याच्या वैयक्तिक कारकिर्दीतील देखील एक मोठी कामगिरी ठरली आहे. ऑस्ट्रेलियातील त्याचे पहिले कसोटी शतक आणि वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) मध्ये परदेशात सर्वाधिक शतके ठोकण्याचा विक्रम त्याच्या कामगिरीची विशेष ओळख करून देतो.ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील ॲशेस मालिकेतील दुसरा कसोटी सामना ब्रिस्बेनमधील

## स्मिथने आठ शतके ठोकली

जो रूटची ॲशेस २०२५ ची सुरुवात त्याच्यासाठी चांगली झाली नव्हती, कारण त्याला पर्थ कसोटीत फलंदाजीने चांगली कामगिरी करता आलेली नाही. ब्रिस्बेनमध्ये खेळल्या जात असेलल्या सामन्यात, त्याने त्याच्या सर्व टीकाकारांना आपल्या बॅटने चोख उत्तर दिले आणि ऑस्ट्रेलियामध्ये त्याची दीर्घ प्रतीक्षा एका शानदार शतकाने यशस्वीरित्या संपुष्टात आणली.जॉ रूट आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) मध्ये घराबाहेर सर्वाधिक शतके ठोकणारा फलंदाज ठरला .

गाबा येथे खेळवण्यात येत आहे. या सामन्याचा पहिल्या दिवसाचा खेळ संपला असून इंग्लंडने जो रूटच्या शतकाच्या जोरावर ९ बाद ३२५ धावा केल्या आहेत.

दिवस-रात्र कसोटीत इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात जो रूटने शानदार शतक लगावून संघाला तारले आहे. तर ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने ६ विकेट्स घेतल्या आहेत.ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील ॲशेस मालिका २०२५ मधील दुसरा कसोटी सामना ब्रिस्बेनमधील गॅबा स्टेडियमवर गुलाबी चेंडूने खेळवण्यात येत आहे. नाणेफेक जिंकून इंग्लंडने प्रथम फलंदाजी करत पहिल्या दिवसाअखेर ९ बाद ३२५ धावा केल्या आहेत. इंग्लंडकरून जो रूटने शानदार शतक झळकवले आहे. त्याने या शतकासह ऑस्ट्रेलियन भूमिवर एक कारनामा रचला आहे. त्याबाबद्दल आपण जाणून घेऊया. नाणेफेक जिंकून इंग्लंडने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु त्याची सुरुवात खूपच निराशाजनक झाली. संघाने आपले पहिले दोन बळी फक्त ५ धावांमध्ये गमावले. इंग्लंड संघ जेव्हा संकटात सापडला होता तेव्हा जो रूटने एक बाजू सांभाळत संघाला चांगल्या स्कोअरपर्यंत पोहचवले. जो रूटने शतकासह इंग्लंडला कठीण परिस्थितीतून बाहेर काढण्यात मोठी भूमिका बजावली.दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या डावात जो रूटने त्याचे ४० वे कसोटी शतक झळकावले.

# विशाखापट्टणममध्ये भारताची पाटी कोरी!

## मालिकेतील शेवटचा सामना 6 डिसेंबर 2025 रोजी विशाखापट्टणममध्ये

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दोन सामने खेळून झाले आहेत. रांची येथील पहिल्या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा १७ धावांनी पराभव केला तर रायपूर येथे खेळवण्यात आलेल्या दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारताचा ४ विकेट्सने पराभव केला.**



तीन सामन्यांची मालिका आता १-१ अशा बरोबरीत आहे. या मालिकेतील शेवटचा सामना ६ डिसेंबर २०२५ रोजी विशाखापट्टणम येथील डॉ. वाय.एस. राजशेखर रेड्डी एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाणार आहे. या स्टेडियमवर भारताचा मागील सहा वर्षांचा रेकॉर्ड वाईट राहिला आहे.तिसरा सामना जिंकणे दोन्ही संघासाठी आवश्यक असणार आहे कारण हा सामना जिंकणारा संघ मालिका देखील जिंकेल. हा तिसरा महत्त्वाचा सामना सुरू होण्यापूर्वी, स्टेडियमच्या इतिहासाबद्दल आपं जाणून घेऊया.

## भारताने सामना गमावला

या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजला १०७ धावांनी पराभूत केले होते. आफ्रिकन संघाबद्दल सांगायचे झाले तर विशाखापट्टणममध्ये हा त्यांचा पहिलाच एकदिवसीय सामना असणार आहे. दक्षिण आफ्रिकेने येथे एकही एकदिवसीय सामना खेळलेला नसला तरी, त्यांनी विशाखापट्टणममध्ये कसोटी आणि टी२० सामने मात्र खेळले असल्यामुळे स्टेडियमचा अंदाज असणार आहे.

येथे पहिला एकदिवसीय सामना २००५ मध्ये खेळवण्यात आला होता. तेव्हापासून, तेथे एकूण १० एकदिवसीय सामने खेळवण्यात आले आहेत. ज्यामध्ये भारतीय संघाने सात जिंकले आणि दोन सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला आहे. तर एक सामना बरोबरीत सुटला आहे. विशाखापट्टणममध्ये भारताने शेवटचा एकदिवसीय सामना मार्च २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळला होता.आफ्रिकन संघाला हरवून मालिका जिंकण्याच्या प्रयत्नात असणार आहे. भारतीय संघाने विशाखापट्टणममध्ये आपला शेवटचा एकदिवसीय विजय २०१९ मध्ये नोंदवला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। शुक्रवार ।

। दि. 5 डिसेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

"ISHWAR EDUCATION & CHARITABLE TRUST'S"

# SANT SAI ENGLISH MEDIUM HIGH SCHOOL

ADINATH NAGAR, GAVHANE VASTI, BHOSARI, PUNE - 411039

SANT SAI ENGLISH MEDIUM SCHOOL BHOSARI

ACHIEVEMENT THROUGH EFFORTS

ESTD. : 1990

**(Fully digitalized School)**

Website: www.santsaischool.com

Email Id: sant.sai.school@gmail.com

## ACTIVITIES INCLUDE:

- Instrumental and vocal music
- Sports and games
- Arts, crafts, and performing arts
- Yoga, meditation & spiritual wellness
- Social outreach & volunteering
- Cultural and national celebrations
- Educational excursions
- Life skill internships & leadership programs
- Robotics & Kreedo Lab

(Year : 2026 - 2027)

**ADMISSION OPEN FOR ALL CLASSES**

Time: 10.00 am to 1.00 pm

(Monday to Saturday)







For details contact :

☎ : 020 - 27124849

OPENING SOON

JMB GURUKUL

Ishwar Education & Charitable Trust

Presents

"JMB Gurukul"

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
। दि. 5 डिसेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## नवजीवन स्पोर्ट्सच्या युवा खेळाडूंनी

# राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत गाजवली बाजी

### आरल सोनावणे व अंशुमन धावडे यांना पदकांसह सुवर्णपदक; पालक व प्रशिक्षकांचे अभिनंदन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**उज्जैन, मध्यप्रदेश येथे झालेल्या ६९ व्या शालेय राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत नवजीवन स्पोर्ट्स, दिघीचे युवा खेळाडू अत्यंत यशस्वी ठरले. भारतातील विविध राज्यांतील संघांनी यात सहभाग घेतला. दिनांक २४ ते २८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान ही स्पर्धा झाली.**






> “ आरल आणि अंशुमनसारख्या युवा खेळाडूंच्या कामगिरीने महाराष्ट्राचे नाव उज्वल केले आहे. नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनचे मार्गदर्शन आणि कष्ट यशस्वी ठरले आहेत. भविष्यातही या प्रतिभावंत खेळाडूंनी मेहनत करत महाराष्ट्राचे आणि देशाचे नाव वाढवेल, अशी मला पूर्ण आशा आहे.
>
> **–उदय गायकवाड,** सरचिटणीस, भाजपा युवा मोर्चा.

१४ वर्षाखालील मुली वयोगटात कु. आरल आनंता सोनावणे यांनी पदक मिळवले. १७ वर्षाखालील मुले वयोगटात अंशुमन निलेश धावडे यांनी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत सांघिक विजेतेपद (सुवर्णपदक) पटकावले. नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष व भाजपा युवा मोर्चा सरचिटणीस उदय गायकवाड यांच्या वतीने दोन्ही खेळाडूंना, तसेच त्यांच्या पालक व प्रशिक्षकांना हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे. संस्थेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, या यशाने खेळाडूंना पुढील काळातही प्रेरणा मिळेल आणि नवजीवन स्पोर्ट्सचा गौरव वाढेल.

---

# चिंचवड येथे “चला उभारू नवी पिढी” चा संकल्प

### प्रतिभा सृजन व्याख्यानमाला 2025 : पद्मश्री गिरीश प्रभुणे, यजुर्वेंद्र महाजन, संजय आवटे यांची उपस्थिती

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट्स, चिंचवड, संस्थेच्या 19 व्या वर्धापनदिनानिमित्त तीन दिवसांच्या “प्रतिभा सृजन व्याख्यानमाला – 2025” चे आयोजन करत आहे. ही व्याख्यानमाला सात ते नऊ डिसेंबर रोजी संध्याकाळी पाच ते सात वाजता, प्रतिभा महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केली जाणार आहे.**



या व्याख्यानमालेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, विचारवंत, उद्योगपती, कला व साहित्य क्षेत्रातील अग्रणी व्यक्ती सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे, नवोन्मेषी विचार, सृजनशीलता, व्यावहारिक ज्ञान आणि नेतृत्व कौशल्य विकसित करणे या व्याख्यानमालेचा मुख्य उद्देश आहे.

व्याख्यानमालेत पहिले व्याख्यान दि. 7 डिसेंबर रोजी दीपस्तंभ फाउंडेशन चे संस्थापक संपादक यजुर्वेंद्र महाजन हे “याला जीवन ऐसे नाव” या विषयावर देणार आहेत. दुसरे व्याख्यान दि. 8 डिसेंबर रोजी प्रेरक वक्ता गणेश शिंदे यांचे “विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालक व शिक्षकांची भूमिका” या विषयावर असणार आहे. व्याख्यानमालेचा समारोप दि. 9 डिसेंबर रोजी




दैनिक लोकमत पुणे चे संपादक संजय आवटे यांच्या “चला उभारू नवी पिढी” या व्याख्यानासह होणार आहे. याच दिवशी प्रतिभा शैक्षणिक संकुलाचा 19 वा वर्धापन दिन साजरा केला जाणार असून, या सोहळ्यात ‘प्रतिभा जीवन गौरव पुरस्कार 2025’ पद्मश्री गिरीश प्रभुणे यांना देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. पुरस्कार समारंभात पुण्यभूषण फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. सतीश देसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांनी सांगितले की, “विद्यार्थ्यांनी फक्त पुस्तकापुरते शिक्षण न घेता प्रत्यक्ष जीवनातील कौशल्ये आत्मसात केली तरच ते खऱ्या अर्थाने प्रतिभावान ठरतात. या हेतूने व्याख्यानमाला व पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी नक्की लाभ घ्यावा.”

KAMALA
Education Society

# सस्नेह निमंत्रण

## प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट्स चिंचवड, पुणे-१९

१९ व्या वर्धापनदिना निमित्त आयोजित

# प्रतिभा सृजन व्याख्यानमाला

दि. ७, ८ व ९ डिसेंबर २०२५ वेळ सायं. ५ ते ७ वा.

**पुष्प पहिले**
दि.७ डिसेंबर २०२५
याला जीवन ऐसे नाव
**मा.यजुर्वेंद्र महाजन**
संस्थापक, दीपस्तंभ फाउंडेशन, पुणे

**पुष्प दुसरे**
दि. ८ डिसेंबर २०२५
विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालक व शिक्षकांची भूमिका
**मा.गणेश शिंदे**
प्रेरक वक्ते

**पुष्प तिसरे**
दि.९ डिसेंबर २०२५
चला उभारू नवी पिढी
**मा.संजय आवटे**
संपादक, दै.लोकमत,पुणे

## प्रतिभा जीवन गौरव पुरस्कार २०२५

दि.९ डिसेंबर २०२५

* सत्कार मूर्ती *
**मा. पद्मश्री गिरिषजी प्रभुणे**

* प्रमुख उपस्थिती *
**मा. डॉ.सतीश देसाई**
संस्थापक, पुण्यभूषण फाउंडेशन

* आपले स्नेहांकित *

**सौ. प्रतिभा शहा**
अध्यक्ष

**डॉ. दीपक शहा**
सचिव

संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व सर्व शिक्षकेतर सेवक प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट्स, चिंचवड, पुणे.

: स्थळ :
प्रतिभा शैक्षणिक संकुल, काळभोर नगर,
चिंचवड पुणे-१९. संपर्क : मो. ८०८७४३४२६५

## राजमाता जिजाऊ महाविद्यालय संघाला

# शालेय विभागस्तरीय क्रिकेट स्पर्धेत विजेतेपद!

### शिक्षण विश्व: 17 वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा, राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**आत्मा मलिक क्रीडा संकुल कोकमठाण येथे नुकतीच संपन्न झालेल्या शालेय विभागस्तरीय क्रिकेट स्पर्धेत 17 वर्षाखालील मुलांच्या गटात राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, लांडेवाडी भोसरी यांचा संघ प्रथम क्रमांकावर आढळून विजेतेपद जिंकण्यात यशस्वी झाला. या विजयानंतर संघाला राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.**

नाणेफेकीनंतर सोलापूर शहर संघाने राजमाता जिजाऊ संघाला 10 ओव्हरमध्ये सात बाद 70 धावांचे आव्हान दिले. प्रत्युत्तर देताना राजमाता जिजाऊ संघाने 9.4 ओव्हरमध्ये 5 बाद करत 71 धावा पूर्ण करून विजयावर शिक्कामोर्तब केले.

विजयी संघात तन्मय पाटील, तन्मय माने, स्वराज थरकुडे, ध्रुवील रायता, किरण सुर्वे, विहान बागड, साई गुंजाळ, आदित्य शेंडगे, शौर्य पाटील, सोहम मोहिते, रोनित पोद्दार, अखिलेश पाटील, आर्यन चव्हाण, जय गोंदकर, मुकुंद बाबर, तेजस गिलबिले यांचा समावेश होता. संघाला कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे आणि प्रशिक्षक दत्तात्रेय वाळके यांच्या मार्गदर्शनाचा विशेष लाभ मिळाला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आणि भोसरीचे प्रथम आमदार विलास लांडे यांनी खेळाडूंना विशेष अभिनंदन केले आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार अजित गव्हाणे, सचिव सुधीर मुंगसे, विश्वस्त विक्रमदादा लांडे, प्राचार्य डॉ. कानडे के.जी., उपप्राचार्या प्रा. किरण चौधरी, उपप्राचार्या डॉ. नेहा बोरसे, रजिस्ट्रार अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा. योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस, तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंच्या यशाचे कौतुक केले. या विजयानंतर राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालय संघाची राज्यस्तरीय स्पर्धेत चमकदार कामगिरी करण्याची अपेक्षा आहे.

> “ राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंच्या मेहनतीने आणि समर्पणाने मिळालेल्या या यशामुळे आम्हाला अभिमान वाटतो. राज्यस्तरीय स्पर्धेतही आमचे खेळाडू गुणवत्ता दाखवतील याची मला खात्री आहे. मेहनत, चिकाटी आणि संघभावनेतून आमचे नवोदित खेळाडू आणखी मोठ्या यशाकडे झेप घेतील, असा विश्वास आहे.
>
> **–विलास लांडे,**
> अध्यक्ष, राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ.

---

## जेजुरीत लोकशाहीचा उत्सव; 78 टक्के मतदान!

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक: शांतता, खेळीमिळीत मतदानाचा हक्क बजावला

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पुरंदर : राज्यभरातील काही नगरपालिका निवडणुका मंगळवारी पार पडल्या, तर काही निवडणुका न्यायालयीन आदेशानुसार पुढे ढकलल्या गेल्या. मात्र खंडोबाची जेजुरीमध्ये नागरिकांनी आपले लोकशाहीचे कर्तव्य उत्साहात पार पाडले आणि 78 टक्के मतदान करून निवडणुकीला यशस्वी बनवले..**

नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे जयदीप बारभाई, शिवसेना (शिंदे गट) चे विठ्ठल सोनवणे, तसेच भाजपाचे सचिन सोनवणे यांनी उमेदवारी नोंदवली. नगरसेवक पदासाठी प्रत्येकी वीस उमेदवार मैदानात होते. जेजुरी ही केवळ धार्मिक तीर्थक्षेत्र नसून सांस्कृतिक गाव म्हणूनही ओळखली जाते. वर्षभर येथे आठ प्रमुख यात्रा भरतात आणि दररोज पर्यटक ये-जा करतात. स्थानिक राजकीय वातावरण शांत आणि खेळीमिळीत राहते; निवडणूक काळातही वाद, राग- द्वेष टाळत, केवळ सभांमध्ये आरोप-प्रत्यारोप होत असल्याचे पाहायला मिळाले.

या वर्षी विशेष म्हणजे, जेजुरी विकासासाठी विरोधक गट एकजुटीने मैदानात उतरत होते. मुलभूत सुविधा अद्याप पूर्ण नसल्या तरी, नागरिकांना ही निवडणूक जेजुरीची घडी बसविण्याची संधी म्हणून पाहिली गेली. निवडणूक दिवशी मतदान केंद्रावर महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून आदर्श मतदान केंद्र उभारले गेले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी प्रांगणातील छत्री मंदिराजवळील जिजामाता शाळा येथे गुलाबी रंगाचे गेट आणि फुगे लावून सजावट केली होती. नव्या आरोग्यवर्धिनीच्या इमारतीची देखील रंगतदार सजावट करण्यात आली होती.मतदानाच्या दिवशी विरोधी व सत्ताधारी पक्षांचे कार्यकर्ते व ग्रामस्थ एकत्र येऊन लोकशाहीचा उत्सव साजरा करत होते. वर्ण, जाती किंवा राजकीय भेदभाव न करता, नागरिकांनी निवडणुकीला खेळीमिळीत वातावरण दिले, ज्याचे कौतुक पोलीस, निवडणूक अधिकारी आणि पर्यटकांनीही केले. जेजुरीतील ही निवडणूक लोकशाहीच्या उत्सवाचे उदाहरण ठरली, जिथे मतदारांनी शांतता, संघटन आणि जबाबदारीने मतदान केले.

#### जेजुरीतील आदर्श मतदान केंद्र...

जेजुरीच्या मध्यभागातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी प्रांगणाजवळील छत्री मंदिरासमोर असलेल्या जिजामाता शाळेतील मतदान केंद्र या वर्षी आदर्श ठरले. येथे सर्व महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली, तसेच गुलाबी रंगाचे गेट आणि फुगे लावून केंद्र सजवले गेले. याशिवाय, नगरपालिका लगत असलेली नव्या आरोग्यवर्धिनीची इमारतही रंगतदार सजवली होती. या व्यवस्थेमुळे मतदान केंद्रावर सर्व पक्षांचे कार्यकर्ते व ग्रामस्थ एकत्र येऊन शांततेत लोकशाहीचा उत्सव साजरा करत होते, हे खास वैशिष्ट्य ठरले.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046